जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -२६७ दिनांक - २२/०६/२०२४**

युनिट-५ गुन्हे शाखा, पुणे शहर

## वाहने चोरी करणा-या रेकॉर्डवरील गुन्हेगारास साथीदारासह केले जेरबंद

दि.१२/०६/२०२४ रोजी तुकाई टेकडी, हडपसर, पुणे येथे तीन चाकी रिक्षा चोरीस गेलेबाबत हडपसर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. १००४/२०२४, भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने युनिट -५ प्रभारी पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी दोन तपास पथके तयार करुन त्यांना चोरीस गेलेल्या रिक्षाचा व आरोचा शोध घेणेकामी आदेशित केले. त्याप्रमाणे नमुद दोन पथके तपास करीत असताना एका पथकातील पोलीस अंमलदार अमित कांबळे यांना बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार गोविंद उर्फ पिंट्या घोडखे रा. गंगानगर, हडपसर पुणे व त्याचा मित्र संदिप यादव रा. हांडेवाडी रोड पुणे यांनी सुमारे १० दिवसापुर्वी तीन आसणी रिक्षा नंबर एम.एच.१२ टि.यु.९१४४ ही रिक्षा चोरलेली असुन ते दोघे पुणे सासवड रोडवरील अंगुर बार या हॉटेल समोर रिक्षामध्ये बसलेले आहेत.

सदरबाबत माहिती मिळाल्याने तपास पथकातील पोलीस स्टाफने वरिष्ठांच्या आदेशाने तपास पथकांने बातमीच्या ठिकाणी जाऊन नमुद रिक्षेचा शोध घेतला अंगुर बार समोर, पुणे सोलापुर रोड, हडपसर पुणे येथे तीन आसणी रिक्षा पार्क असल्याचे व त्यामध्ये दोन इसम हे बसलेले दिसले. तेव्हा बातमीप्रमाणे आमची खात्री होताच वरिल स्टाफचे मदतीने त्यांना जागीच पकडले. त्याचे नावे १) **संदिप बाबुलाल यादव वय ३० वर्षे रा. जिल्हा परिषद शाळेसमोर, हांडेवाडी चौक, होळकरवाडी, पुणे २) गोविंद उर्फ पिंट्या हनुमंत घोडखे वय २४ वर्षे रा. गल्ली नंबर ५, वरदविनायक कॉलणी, गंगानगर, हडपसर पुणे** असे असुन त्यांचेकडुन बातमीच्या अनुषंगाने तपास करता त्या दोघांनी रिक्षा चोरी केल्याचे कबुल केले. तसेच त्यांचेकडे आणखी सखोल तपास करता त्या दोघांनी आणखी हिरो होंडा स्प्लेंडर मोटर सायकल चोरी केल्याचे कबुली देऊन चोरी केलेली मोटार सायकल काढुन दिली. नमुद आरोपीताकडुन एकुण १,७५,०००/-रु.कि.चा मुद्देमाल त्यामध्ये १) १,५०,०००/- एक बजाज कंपनीची तीन आसणी रिक्षा व २) २५,०००/- रु कि.ची हिरो होंडा स्प्लेंडर मोटर सायकल असे जप्त करुन त्यांचेकडुन दोन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस उपायुक्त,गुन्हे, श्री. अमोल झेंडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री. सतिश गोवेकर, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे, पोलीस अंमलदार रमेश साबळे, अमित कांबळे व शशिकांत नाळे यांनी केलेली आहे.